N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): बीड **P.S.**(ठाणे): अंबाजोगाई शहर **Year** (वर्ष): 2022

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0199 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 11/05/2022 15:35 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): मंगलवार
**Time Period** (कालावधी): पहर 4
**Date From** (दिनांक पासून): 26/04/2022
**Date To** ( दिनांक पर्यंत): 26/04/2022
**Time From** (वेळेपासून): 11:27 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 11:51 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक ): 11/05/2022 **Time** (वेळ): 15:23 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ
**Entry No.** (नोंद क्र.): 015 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 11/05/2022 15:23 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पूर्व, 0.1 किमी
**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): पोलीस उप निरीक्षक,सुर्यवंशी ,पोलीस ठाणे अंबाजोगई शहर येथील , अंबाजोगई शहर,अंबाजोगई शहर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): बालाजी भास्कर घाटे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1991 **(d) Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | छत्रपतीनगर ,अंबाजोगई,अंबाजोगई,अंबाजोगाई शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | छत्रपतीनगर ,अंबाजोगई,अंबाजोगई,अंबाजोगाई शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.): 91-7588857777

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गोपाल दिंगबर सुर्यवंशी | | | 1. बीटीमोरे नगर, केज रोड,,अंबाजोगाई, अंबाजोगाई,अंबाजोगाई,अंबाजोगाई शहर, बीड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद कम्प अंबाजोगाई, जि.बीड. दिनांक :- 11/05/2022. मी बालाजी भास्कर घाटे, वय 31 वर्ष, व्यवसाय हटेल चालक, रा.छत्रपती नगर, अंबाजोगाई ता.अंबाजोगाई जि.बीड मो.नं. 7588857777. समक्ष विचारले वरुन सांगतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन अंबाजोगाई येथे हटेल चा व्यवसाय करतो.मी दि.25/04/2022 रोजी अ○सीबी कार्यालय, बीड येथील श्री.शंकर शिंदे, पोलीस उप अधीक्षक यांना फोन करुन माझी एका लोकसेवकाविरुध्द लाच मागत असल्याबाबत तक्रार असल्याचे सांगुन दिनांक 26/04/2022 रोजी अंबाजोगाई येथे येवुन तक्रार घेवुन कार्यवाही करण्याची विनंती केली. त्यावरुन श्री.शंकर शिंदे हे दिनांक 26/04/022 रोजी अंबाजोगाई येथे पंच व स्टाफसह आल्यानंतर त्यांचे समक्ष तक्रार दिली की, माझ्या विरुध्द तसेच माझा मित्र शेख बाबा रा.क्रांतीनगर, अंबाजोगाई व इतर दोन ते तिन अनोळखी ईसम याचे विरुध्द भा.द.वि.कलम 336 सह कलम 3/25, भारतीय शस्त्र अधिनियम प्रमाणे दि.28/03/2022 रोजी गु.र.न. 126/2022 पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर येथे गुन्हा दाखल असुन त्या गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक, गोपाल दिंगबर सुर्यवंशी हे करत आहेत. सदर गुन्हयात मला व माझा मित्र शेख बाबा ऊर्फ जफर शेख यांना अटक करण्यात आली होती. आम्हा दोघाची दि.09/04/2022 रोजी जामिन झाली आहे. दि.24/04/2022 रोजी माझी व पोलीस उप निरीक्षक सुर्यवंशी साहेब यांची भेट झाली होती, तेव्हा त्यांनी मला कळवले की तुम्हा दोघा विरुध्द दाखल गुन्हयामध्ये प्रतिबंधक कारवाई एलसीबी बीड येथे न करता तहसिल कार्यालय,अंबाजोगाई येथे करण्यासाठी 50,000/- रुपयाची मागणी केली वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.मी दिलेल्या तक्रारीवरुन दि.26/04/2022 रोजी पोलीस उपअधीक्षक, श्री.शंकर शिंदे यांनी पोलीस उप निरीक्षक, सुर्यवंशी साहेब हे माझ्याकडे माझे कामासाठी लाचेची मागणी करतात किंवा कसे याबाबत पडताळणी व्हईस रेकार्डर च्या साहयाने करण्याचे ठरवुन व्हईस रेकार्डर ची माहीती मला व पंचास देण्यात आली. पोलीस उप अधीक्षक, श्री.शंकर शिंदे यांनी मला व पंच क्र.1 भोलशंकर यांना माझ्याकडे व्हईस रेकार्डर चालु करुन देवुन पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर येथे पाठवुन 11.27 ते 11.51 वा.चे दरम्यान लाचमागणी पडताळणी करण्यात आली. लाचमागणी पडताळणी दरम्याण पोलीस उप निरीक्षक, सुर्यवंशी यांनी मला व माझा मित्र शेख बाबा यांच्या विरुध्द प्रतिबंधक कार्यवाही एलसीबी बीड येथे न करता तहसिल अंबाजोगाई येथे करण्यासाठी 50,000/- रु. ची लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 40,000/- रुपये लाचेची लाच रक्कम स्विकारण्याचे पंचासमक्ष मान्य केले. तसा दि. 26/04/2022 रोजीचा लाचमागणी पडताळणीचा पंचनामा करण्यात आला.त्यानंतर दिनांक 02/05/2022 रोजी मला पोलीस उप निरीक्षक, सुर्यवंशी यांचा फोन आल्याने मी त्यांना परत फोन केला असता, त्यांनी मला मी आज रोजी सुट्टीवरुन आलो असल्याचे सांगुन भेटण्यासाठी सायंकाळी सहा वाजण्याचे सुमारास बोलविले. त्यावरुन मी पोलीस उप अधीक्षक, श्री.शंकर शिंदे यांना फोन करुन माझे तक्रारीप्रमाणे पुढील कार्यवाही करण्याची विनंती केली. त्यावरुन श्री.शंकर शिंदे व सापळा पथक पाण्याची टाकी, छत्रपती नगर, अंबाजोगाई येथे माझे राहते घरी आले. त्यानंतर माझ्या राहत्या घराच्या उत्तर बाजुच्या खोलीत शासकीय पंचासमक्ष श्री.शंकर शिंदे यांनी मला व दोन्ही पंचांना अँथ्रासिन पावडर

व अल्ट्राव्हायलेट लम्प यांचा उपयोग व गुणधर्म सांगुन त्याचे प्रात्यक्षीक दाखवुन मी हजर केलेल्या 40,000/-रु.लाच रकमेस अँथ्रासिन पावडर लावली व सदरची लाच रक्कम ही माझे पँटचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवली. मला लाच स्वीकृतीनंतर करावयाचा ईशारा नेमुन दिला. वगैरे बाबींचा सापळापुर्व कारवाईचा पंचनामा करण्यात आला.सपळापुर्व कारवाईचा पंचनामा पुर्ण झाल्यानंतर मला श्री. शंकर शिंदे यांनी पोलीस उप निरीक्षक,सुर्यवंशी यांना लाच रक्कम देण्यासाठी व भेट घेण्यासाठी व्हईस रेकर्डर चालु करुन पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर येथे पाठवण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यावर मी श्री.शंकर शिंदे यांना विनंती केली की, पोलीस उप निरीक्षक, सुर्यवंशी यांची भेट घेण्याचे आगोदर ते पोलीस स्टेशनला आहेत का? याची खात्री करण्यासाठी फोन करु, त्यावर व्हईस रेकर्डर चालु करुन माझे फोनवरुन पोलीस उप निरीक्षक, सुर्यवंशी यांना फोन केला असता त्यांनी कळवले की, मी बाहेर आलो आहे, मी आल्यावर फोन करतो, असे म्हणाले. परंतु पोलीस उप निरीक्षक, सुर्यवंशी यांनी नंतर मला फोन केला नाही. तसा सापळा कारवाई स्थगीती पंचनामा दिनांक 02/05/2022 रोजी करण्यात आला. त्यानंतर दिनांक 04/05/2022 रोजी मी पोलीस उप अधिक्षक श्री.शंकर शिंदे यांना फोन करुन कळविले की, मी आज रोजी पोलीस उप निरीक्षक, श्री सुर्यवंशी यांची भेट घेणार आहे. तुम्ही अंबाजोगाई येथे येवुन पुढील कारवाई करावी अशी विनंती केली. त्यावर श्री.शंकर शिंदे हे सापळा पथकासह पाण्याच्या टाकी जवळ, छत्रपती नगर, अंबाजोगाई येथे आले. त्यांनी मला, पंचांना व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचनाची उजळणी करुन देवुन, दिनांक 02/05/2022 रोजी सापळा पुर्व कारवाई मधील लाच रक्कम 40,000/- रुपये ज्यास अँथ्रासिन पावडर लावलेली माझे पँटचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवुन व्हईस रेकर्डर चालु करुन माझ्याकडे देऊन, लोकसेवक पोलीस उप निरीक्षक, सुर्यवंशी यांना भेटुन लाच रक्कम देण्यासाठी मला व पंच क्र.1 यांना पोलीस स्टेशन अंबाजोगाई शहर येथे पाठविण्यात आले. आमचे पाठोपाठ सापळा पथकासह येत होते. मी व पंच क्र.1 असे दोघेही पोलीस स्टेशन अंबाजोगाई शहर येथे गेलो तेथे पोलीस उप निरीक्षक सुर्यवंशी हे त्यांचे कक्षात हजर होते. त्यांचेत व माझ्यात माझे कामाविषयी चर्चा झाली. त्यावेळी मला श्री.सुर्यवंशी यांनी आज जामीन होणार नाही तिन वाजता सातबारा घेवुन ये एक तासाने फोन करतो असे म्हणाले. त्यावर आम्ही सुरक्षीत स्थळी पाण्याची टाकी अंबाजोगाई येथे येवुन पोलीस उप निरीक्षक, सुर्यवंशी यांच्या फोन ची वाट पाहत थांबलो. मी पुन्हा पोलीस उप निरीक्षक सुर्यवंशी यांना 15.52 वाजता फोन लावला असता, त्यांनी फोन उचलला नाही. त्यांनतर मला माझ्या मोबाईलवर पोलीस उप निरीक्षक सुर्यवंशी यांनी 20.01 वा फोन करुन राजीव गांधी चौकात भेटावयास बोलविल्याने मी व पंच क्र 1 असे माझे मोसा वर 20.12 निघुन राजीव गांधी चौकात जावुन थांबल्यानंतर पोलीस उप निरीक्षक, सुर्यवंशी हे त्यांचे मोटार सायकलवर यशवंतराव चव्हाण चौक, अंबाजोगाई कडुन आले व माझ्या कडे पाहुन शिवाजी चौक, अंबाजोगाई कडे निघुन गेले. त्यानंतर मी पोलीस उप निरीक्षक सुर्यवंशी यांना त्यांचे मोबाईलवर फोन केला असता त्यांचा मोबाईल बंद होता. तसा दिनांक 04/05/2022 रोजी सापळा कारवाई स्थगिती पंचनामा करण्यात आलेला आहे.त्यानंतर मी दिनांक 07/05/2022 रोजी पोलीस उप निरीक्षक, सुर्यवंशी यांना भेटण्यासाठी अंबाजोगाई शहर येथे गेलो असता पोलीस उप निरीक्षक, सुर्यवंशी यांनी मला पाहुन काही न बोलता बाहेर निघुन गेले. त्यांना माझा संशय आल्याने पोलीस उप निरीक्षक, सुर्यवंशी हे माझ्याकडुन यापुढे लाच रक्कम स्वीकारण्याची शक्यता कमी असल्याची माझी खात्री झाली आहे.तरी माझ्या व माझा मित्र शेख बाबा उर्फ जफर शेख यांचेवर दाखल गुन्हयात प्रतिबंधक कार्यवाही एल.सी.बी. बीड येथे न करता तहसिल कार्यालय अंबाजोगाई येथे करण्यासाठी पोलीस उप निरीक्षक, सुर्यवंशी यांनी दिनांक 26/4/2022 रोजी त्यांचे पदाचा दुरुपयोग करुन त्यांना मिळणा-या पारिश्रमिका खेरीज प्रवर्तकदान, बक्षिस म्हणुन स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी 50,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती पंचासमक्ष 40,000/- लाच रक्कमेची मागणी करुन लाच रक्कम मिळण्याचा प्रयत्न केला.म्हणुन माझी पोलीस उप निरीक्षक, गोपाल दिगंबर सुर्यवंशी, वय 34 वर्ष, पोलीस ठाणे, अंबाजोगाई शहर रा.बी.टी.मोरे नगर, केज रोड, अंबाजोगाई मुळ रा.कामखेडा ता. रेणापुर जि.लातुर यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे. ही फिर्याद दिली, ती माझे सांगणे प्रामणे संगणकावर टंकलिखीत केली असुन, बरोबर व खरी आहे.

13.Action **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): BALASAHEB NARAYAN PAWAR(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे,त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): BALASAHEB NARAYAN PAWAR
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI